# भारतीय संविधानातील नववे परिशिष्ट : निर्मिती आणि वाटचाल

**किरण तात्याजी कोंढेकर**
संशोधक विद्यार्थिनी

**डॉ. विवेक मो. दिवान**
मार्गदर्शक
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आर. एस. मुंडले धरमपेठ कॉलेज, नागपूर

---

***गोषवारा :***

*देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही देशांमध्ये अनेक समस्यांना व्यक्तीला सामोरे जावे लागत होते.वेगवेगळ्या समस्यांपैकीच एक समस्या सामाजिक विषमतेची होती. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी जमीन सुधारणेची आवश्यकता महत्त्वाची ठरते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही एकीकडे हजारो एकर जमीनदार, धनाढ्य व्यक्ती तर दुसरीकडे उदरनिर्वाह न करू शकणारे नागरिक होते. ही विषमतेची दरी नष्ट करण्यासाठी तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय संविधानामध्ये एक विशेष तरतूद केली.१९५१ च्या पहिल्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे काही कायद्यांचे न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण करणे आणि कोणत्याही कायदेशीर आव्हानांशिवाय त्यांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे या उद्देशाने या परिशिष्टाची निर्मिती करण्यात आली.*

---

**विषयप्रवेश :**

मनुष्य एक सामाजिक प्राणी आहे अत: समाजामध्ये राहूनच व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्व विकासाची सर्वतोमुखी प्रगती करू शकतो. समाजामध्ये जीवन जगत असताना अनेक समस्या निर्माण होतात. या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी व्यक्ती प्रस्तुत व्यवस्थेत असलेल्या कायद्याचा आधार घेतो. समस्या या वेगवेगळ्या प्रकारच्या असू शकतात.कधी त्या समस्यांचे स्वरूप सामाजिक तर कधी राजकीय तर कधी आर्थिक स्वरूपाचे असू शकतात.

व्यक्ती समाजात जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्तीला आपले जीवन मुक्तपणे जगायचे असते तसेच भयमुक्त व अभावमुक्त राहण्याचा प्रयत्न प्रत्येक मनुष्य करतो. जगण्यासाठी एखाद्या व्यक्तीला किमान गरजा अन्न,वस्त्र आणि निवारा आवश्यक असते. मनुष्य या गरजा नैसर्गिक संसाधनांद्वारे पूर्ण करतो. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला कठोर परिश्रम आवश्यक आहे. मात्र ठराविक कालावधीनंतर या नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता कमी होते. या कमतरतेपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी माणूस वर्तमानाच्या गरजांबरोबरच भविष्यातील लक्षात घेऊन अतिरिक्त प्रमाणात साठवण्याचा प्रयत्न करतो. भविष्यातील अनिश्चिततेची भीती त्याला या प्रकारचा संग्रह करण्यास भाग पाडते.परंतु एका व्यक्तीने अशा प्रकारे जमा केल्याने इतर लोकांचे दुःख वाढते आणि त्यांना आवश्यक वापरासाठी साधनांच्या कमतरतेचा सामना करावा लागतो. परिणामी व्यक्तींच्या परस्पर हितसंबंधांमध्ये संघर्ष होतो ज्यामुळे समाजात भेदभाव,अराजकता, गुन्हेगारी,अन्याय,युद्ध इत्यादीची परिस्थिती निर्माण होते. समाजात प्रचलित असलेल्या या अराजक व्यवस्थांवर शांततापूर्ण उपाय आणि व्यक्तींचा विकास परस्पर सौहार्द

सामंजस्यासाठी समाजात न्यायाची गरज आहे.

भारतीय संविधान हे लोकांच्या विश्वास श्रद्धा आणि इच्छांचे एक असे दस्तावेज आहे ज्याला विशेष कायदेशीर पवित्र आहे.संविधान हा देशाचा मूलभूत कायदा आहे.जगभरात विविध प्रकारची सरकारे प्रचलित आहे. एखाद्या राष्ट्राच्या राज्यघटनेत समाविष्ट असलेले तत्त्वज्ञान त्या सरकारचे प्रकार ठरवते. घटनावादाची कल्पना सरकारी संरचनेच्या कार्यपद्धतीचे मार्ग सुचवते आणि अधिकाराच्या वापरासह वैयक्तिक स्वातंत्र्य आणि अधिकार कसे सुनिश्चित केले जातात याचे ज्ञान येते. समाजाचे कामकाज सुरळीत चालविण्यासाठी या सरकारी संस्था आवश्यक आहे पण राज्याची सत्ता निरंकुश नसावी.

**बीजसंज्ञा :** संविधान,नववे परिशिष्ट, भूमी सुधार, सामाजिक न्याय,

**प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे :**

1. भारतीय संविधानामध्ये नवव्या परिशिष्टाची आवश्यकता का भासली याचे अध्ययन करणे.
2. भूमी सुधारक कायद्यातून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे.
3. ग्रामीण भागातील गरिबी दूर करणे.

**संशोधन पद्धती :**

संशोधन कार्याची सुरुवात व सांगता तथ्यांच्या आधारावरच होते.या संशोधन कार्यात दुय्यम संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.यामध्ये विविध शासकीय,निमशासकीय, प्रकाशित व अप्रकाशित लिखित माहिती त्याचबरोबर लेख, मासिके, ग्रंथ, न्यायालयीन निर्णय, वृत्तपत्रे, वार्षिकांक इत्यादींचा आधार घेण्यात आला आहे.

**भारतीय संविधानातील नवव्या परिशिष्टाची पार्श्वभूमी :**

भारतीय संविधान जेव्हा लागू झाले तेव्हा मूळ संविधानामध्ये ३९५ कलमा २२ भाग व ८ परिशिष्टे होते.भारतीय संविधानामध्ये काळ, वेळ, परिस्थिती पाहून काही बाबी संविधानातील रद्द करता येतात तर काही नव्याने समाविष्ट करण्यासाठी संविधान संशोधनाची म्हणजेच घटनादुरुस्तीचा अधिकार भारतीय संविधानामध्ये नमूद आहे. नववे परिशिष्ट हे भारतीय संविधानातील एक विशेष तरतूद आहे जी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या पंतप्रधान पदाच्या काळात लागू करण्यात आली होती.१९५१च्या पहिल्या संविधान संशोधन कायद्याद्वारे काही कायद्यांचे न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण करणे आणि कोणत्याही कायदेशीर आव्हानांशिवाय यांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे या उद्देशाने ती ८ जून १९५१ ला जोडण्यात आली होती. यात पहिल्या दुरुस्तीमध्ये एकूण १३ कायदे जोडले गेले.

**भारतीय संविधानातील नवव्या परिशिष्टाची निर्मिती :**

नववे परिशिष्टाची निर्मिती करण्याचा प्राथमिक उद्देश जमीन सुधारणा कायदे आणि इतर प्रगतिशील कायद्याचे मूलभूत हक्कांचे उल्लंघन केल्याच्या कारणास्तव न्यायालयांनी अवेद्य ठरवले जाण्यापासून संरक्षण करणे हा होता.त्यावेळी कृषी सुधारणा जमिनीचे पुनर्वितरण आणि भाडेकरूच्या हक्कांचे संरक्षण यांसारख्या समस्यांना

तोंड देऊ शकणारे कायदे करण्याचे आवश्यकता होती. तथापि या कायद्यांना अनेकदा कायदेशीर आव्हानांना सामना करावा लागला ज्यामुळे त्यांच्या अंमलबजावणीस विलंब आणि अडथळे निर्माण झाले. भूमी सुधारणा म्हणजे जमिनीच्या असमान वाटपाला तोंड देण्यासाठी आणि सामाजिक न्यायाला चालना देण्यासाठी भारत सरकारने राबविलेल्या उपाययोजनांच्या मालिकेचा संदर्भ होय.

स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक, आर्थिक असमानता दूर करण्यासाठी आणि सामाजिक न्यायाला चालना देण्यासाठी जमीन सुधारणा हा देशाच्या प्रवासाचा एक अविभाज्य भाग राहिला आहे. भूमिहीन शेतकऱ्यांना जमीन पुनर्वितरण करून आणि उपेक्षित समुदायांना कृषी संसाधनांमध्ये प्रवेश होऊन अधिक समतापूर्ण समाज निर्माण करणे हा यामागचा उद्देश होता.एकंदरीतच भारताच्या कृषी परिदृश्यात परिवर्तन करण्यात आले आणि सामाजिक तसेच आर्थिक न्यायाला चालना देण्यात सुधारणांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.जरी सततच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि जमीन संसाधनांचे समान वितरण करण्यासाठी नवव्या परिशिष्टाची निर्मिती करण्यात आलेली दिसून येते.

**भारतीय संविधानातील नवव्या परिशिष्टाची उद्दिष्टे :**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे समाजवादी विचारसरणीचे होते. एकीकडे हजारो एकर जमीन असणारे श्रीमंत व्यक्ती तर दुसरीकडे ज्यांना स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी साधने देखील नव्हती जी अल्पभूधारक किंवा भूमिहीन होती. त्यामुळे भारतात विषमतेची दरी वाढत गेली.ही विषमता कमी करण्यासाठी व नष्ट करण्यासाठी पंडित नेहरूंनी नवव्या अनुसूचीच्या निर्मितीचा विचार मांडला. या परिशिष्टाची उद्दिष्टे काय होती ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

**१. गरीबी निर्मूलन :**

भारत एक विकसनशील देश आहे जरी देशाची अर्थव्यवस्था वाढत असली तरी देशाला अनेक आव्हाने आहेत जे देशांच्या विकास प्रक्रियेत अडथळा आणतात. असेच एक आव्हान भारतातील व्यापक गरिबांचे आहे. दारिद्र्य निर्मूलन हे गरिबीच्या समस्येच्या सामना करण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजनांचा संच म्हणून वर्णन केले आहे. लोकांना गरीबीच्या खाईतून बाहेर काढणे हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. भूमिहीनांना त्यांची सामाजिक आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि ग्रामीण गरिबी कमी करण्यासाठी भूमी सुधारणा करण्यात आल्या होत्या.

**२. सामाजिक न्याय :**

सामाजिक न्याय म्हणजे समाजातील प्रत्येकाला समान न्याय देणे होय.सामाजिक न्याय अंतर्गत प्रत्येकाला समान राजकीय, आर्थिक आणि सामाजिक घटक हक्क तसेच संधी उपलब्ध करून देणे होईल. समाजातील सामाजिक आर्थिक असमानता कमी करून सर्व नागरिकांना सामाजिक समानता प्रदान करणे हा सामाजिक न्यायाचा उद्देश आहे.

**३. कृषी उत्पादकता वाढवणे :**

कोणत्याही राष्ट्राचा आर्थिक विकास साधायचा असल्यास त्यात प्रथम शेती व शेतीवर आधारित

उद्योगांचा विकास करावा लागतो कारण शेती हीच सर्व उद्योगांचा पाया आहे. कृषी क्षेत्र हे आजही जगातील सर्वाधिक लोकसंख्येचे उपजीविकेचे साधन तसेच उत्पन्नाचे स्त्रोत आहेत.जगातील सर्व विकसित राष्ट्रांनी प्रथम कृषी क्षेत्राचा विकास करून औद्योगिक विकास केलेला आहे. कार्यक्षम शेतीसाठी जमिनीचे वाटप करून जमिनीची क्षमता वाढवणे व भूमीहीनांना न्याय मिळवून देणे हा नवव्या अनुसूचीचा उद्देश दिसून येतो.

**४. भाडेपट्टा सुधारणा :**

भाडे करून च्या हक्कांचे रक्षण करणे भाडेपट्टा सुरक्षितता सुनिश्चित करणे योग्य भाडेपट्टा स्थापित करणे आणि अन्याय्य भेदखल करण्यास प्रतिबंध करणे.

५. शेती उत्पादन आणि लागवड कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि जमिनीचे तुकडे होणे टाळण्यासाठी प्रयत्न करणे एकंदरीतच ग्रामीण भागातील गरिबी कमी करणे, भाडेकरूंच्या सुरक्षा सुधारणे, समता पूर्ण समाज निर्माण करणे आणि कृषी उत्पादकता वाढवणे हे यांचे उद्दिष्ट होते.

**भारतीय संविधानातील नवव्या परिशिष्टाची ठळक वैशिष्ट्ये :**

1. नववे परिशिष्ट आर्थिक असमानता कमी करण्यास आणि आरक्षणासारखे कायदे व धोरणांच्या संरक्षणावर सामाजिक कल्याणाला प्रोत्साहन देते. न्याय आणि समता पूर्ण समाजाचा प्रसार नवव्या अनुसूचीमार्फत करता येतो.
2. कलम ३१(बी) हे नवव्या अनुसूची मध्ये समाविष्ट असलेल्या कायदे आणि नियमांना कोणत्याही मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्याच्या आधारावर आव्हान देण्यापासून व अवैध ठरवण्यापासून संरक्षण देते.
3. जमीन व आरक्षणासंबंधी कायदे नवव्या परिशिष्टातील कायदे प्रामुख्याने शेती आणि जमीन समस्यांशी संबंधित आहेत.उदाहरणार्थ तामिळनाडूचा आरक्षण कायदा
4. **जमिनीचे विकेंद्रीकरण :** जमीनदारांमध्ये जमिनीचे केंद्रीकरण रोखणे किंवा कमी करणे आणि विषमता नष्ट करून न्याय समाज निर्माण करण्याचा घटनात्मक आदेशाची पूर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जमिनीचे वाटप करणे. उदाहरणार्थ सिलिंग.
5. सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करणे सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी असलेल्या कायद्यांमध्ये जमीन सुधारणा, कामगार कायदे, पीसंपत्तीचे पुनर्वितरण करून लोकांच्या राहणीमानात आणि दर्जामध्ये सुधार आणणे.

**भारतीय संविधानातील नवव्या परिशिष्टातील दोष :**

**१. सत्तेचा गैरवापर :**

तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी गरिबी दूर करून समानता प्रस्थापित करण्यासाठी नवव्या अनुसूचीची निर्मिती केली गेली.भूमी सुधार, जमीनदारी उन्मुलन,उद्योगांचे राष्ट्रीयकरण रोजगार आणि शिक्षण व्यवस्थेमध्ये मागास जातीसाठी आरक्षणाच्या विचारातून या परिशिष्टाची निर्मिती केली. भूमी सुधार आणि आरक्षण या दोन माध्यमातून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे तत्कालीन काँग्रेसच्या विचारांमध्ये होते परंतु अलीकडे राजकीय स्वार्थासाठी किंवा राजकीय कारणांसाठी सरकार नवव्या परिशिष्टामध्ये कायदे जोडू शकते. ज्यामुळे अपारदर्शकता

निर्माण होते.

**२. मूलभूत अधिकारांचे उल्लंघन :**

नववे परिशिष्ट सरकारने संविधानाने हमी दिलेल्या समानतेच्या अधिकारांचे उल्लंघन करणारे आरक्षणासारखे कायदे करण्याची परवानगी देते.

३. न्यायालयीन देखरेखीचा अभाव नवव्या परिशिष्टामध्ये कायद्यांचा समावेश केल्यामुळे न्यायपालिकेच्या त्यांच्या घटनात्मकतेचा आढावा घेण्याच्या अधिकारावर मर्यादा येतात नवव्या परिशिष्टामध्ये समाविष्ट कायद्यांचे १९७३ पूर्वी न्यायिक पुनर्विलोकन होऊ शकत नव्हते. ज्यामुळे न्यायालयीन देखरेखीचा अभाव निर्माण होतो.

**४. मनमानी कारभार :**

विविध सरकारांनी आपापल्या कालखंडामध्ये अवास्तव्य आणि मनमानी कारभार केल्याचे दिसून येते.म्हणजेच आपल्या पद्धतीने नवव्या अनुसूची चा वापर केल्याचे दिसून येते.उदाहरणार्थ.. झारखंड आरक्षण

**५. नियंत्रण आणि संतुलन :**

नवव्या परिशिष्टाची वैधता वादाचा विषय ठरली आहे. काही लोकांच्या मते ते नियंत्रण आणि संतुलनाच्या तत्वाला कमकुवत करते आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायव्यवस्थेच्या अधिकाराला मर्यादित केलेले दिसून येते.

**भारतीय संविधानातील नवव्या परिशिष्टाला प्रभावी करण्यासाठी उपाययोजना :**

विषमता नष्ट करण्यासाठी भूमीहीनांना ज्या जमिनी दान दिलेले आहे त्यातील काही वादात अडकलेल्या दिसतात ते वाद सोडविण्याचे काम करणे. तसेच जमीन हस्तांतरण मालकी जमिनीशी संबंध नसणाऱ्या व्यक्तींकडे करू नये.

लोकांमध्ये जमीन सुधारणा कार्यक्रमाविषयी जनजागृती करून लोकांचे मत परिवर्तन घडवून आणणे.जमीन सुधारणा कायद्यांची माहिती चित्रफितीद्वारे लोकांपर्यंत पोहोचवणे.

जमिनीची मालकी कुळाना देण्यासोबतच शेती उपयोगी अवजारे,भांडवल व इतर स्वरूपाचे शेतीसंबंधीत आर्थिक सहाय्य त्यांना देण्यात यावे.

आरक्षण हा एक महत्त्वाचा उपाय आहे परंतु कार्यकारी आणि कायदेमंडळाने केलेल्या कोणत्याही मनमानी कृतींना प्रतिबंध करण्यासाठी त्याचा न्यायालयीन आढावा घेण्यात यावा.

नववे परिशिष्ट ज्या हेतूने निर्माण करण्यात आले होते त्याच अनुषंगाने कायदे निर्मिती करण्यात यावी जेणेकरून त्या अनुसूचीचा गैरवापर होणार नाही. कृषी सुधारणा आरक्षण अनुच्छेद ३९ बी आणि ३९ सी मध्ये निर्दिष्ट केलेल्या निर्देशक तत्वाच्या अंमलबजावणीशी संबंधित कायद्यापुरते मर्यादित असले पाहिजे.

जेव्हा इच्छित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इतर कोणतेही मार्ग उपलब्ध नसतील तेव्हा नवव्या परिशिष्टाचा उपाय म्हणून वापर केला पाहिजे. नवव्या परिशिष्टेचा अवलंब करण्यापूर्वी सरकारने इतर सर्व पर्यायांचा वापर आधी

केला पाहिजे. आणि या परिशिष्टामध्ये कायद्यांचा समावेश करताना एक पारदर्शक प्रक्रिया असली पाहिजे. त्याचबरोबर विशिष्ट कायदा का समाविष्ट करण्यात आला तो कायदा समाविष्ट करण्यामागचा मूळ हेतू काय आहे या संदर्भाची स्पष्ट कारणे दिली पाहिजे.या पद्धतीने या परिशिष्टाचा वापर केल्यास पारदर्शकता टिकून राहील.

**समारोप :**

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या प्रधानमंत्री पदाच्या काळात सादर केलेल्या भारतीय संविधानातील नवव्या परिशिष्टातील भूमी सुधारणा आणि सामाजिक कल्याणाशी संबंधित कायद्यांचे न्यायालयीन आव्हानांपासून संरक्षण करण्यात महत्वाची भूमिका दिसून येते. भारतीय संविधानातील नववे परिशिष्ट हे प्रगतिशील उपाययोजना राबविण्यात महत्त्वाचे ठरले असले तरी त्याचा वापर वादविवाद आणि वादांना सामोरे गेला आहे. एकंदरीतच भारतामध्ये जी विषमतेची दरी निर्माण झाली होती ती नष्ट करून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा या परिशिष्टाच्या निर्मिती मागचा हेतू असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**


- बोधनकर सुधीर, अलोने विवेक, "सामाजिक संशोधन पद्धती",श्री साईनाथ प्रकाशन, (जानेवारी २००३), नागपुर
- आगलावे प्रदीप,"सामाजिक संशोधन पद्धती शास्त्रीय व तंत्र", श्री साईनाथ प्रकाशन,(२००८), नागपूर
- भोळे भा.ल., "भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण", श्री साईनाथ प्रकाशन, (जानेवारी २००३), नागपुर.
- कुरकुटे, खरात, देशमुख, "भारतीय लोकशाहीची वाटचाल" अथर्व प्रकाशन, (२०२१) जळगाव.
- त्रिपुरदमन सिंह,"वे सोलाह दिन नेहरू मुखर्जी और संविधान का पहिला संशोधन", पेंग्विन रैन्डम हाऊस इंडिया,२०२२
- चंपकम दोरईराजन / मद्रास स्टेट,१९५१
- केशवानंद भरती / केरळ राज्य,१९५३
- आई आर कोएल्हो / तामिळनाडू स्टेट २००७
- दैनिक वृत्तपत्रे